# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि.
ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र-३३६/२०२४ दिनांक-२९/०८/२०२४.

## “घरफोडी चोरी करणाऱ्या ४ आरोपींकडुन ४ लाख रुपये किंमतीचा मुददेमाल व ९ गुन्हे उघडकीस आणण्यास वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश”

फिर्यादी श्री. संदिप सुदाम व्यवहारे यांचे गाळयाचे दि. १४/०८/२०२४ रोजी रात्री १०.०० वा ते दि. १५/०८/२०२४ रोजी सकाळी ०८.३० वा. चे दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने गाळा न.०१, नम्रता फोटो स्टुडिओ, भदोई दुध डेरी समोर, साईनगर, गौराईपाडा, वसई पुर्व या गाळयाचे शटरच्या पट्टया उचकटुन त्यावाटे आत प्रवेश करुन गाळयातील मध्ये ठेवलेला लॅपटॉप, कॅमेरा व कागदपत्रे असा एकुण १४,०००/- रुपये किंमतीचा माल घरफोडी चोरी करुन नेला. सदर बाबत वालीव पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ३८७/२०२४ कलम ३३१ (४), ३०५ (ए), भारतीय न्याय संहीता २०२३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वसई-विरार परीसरात घरफोडी चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ यांनी घरफोडी चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत आदेश दिले. श्री.उमेश माने- पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग व श्री. जयराज रणवरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शन व सुचनांनुसार वालीव पोलीस ठाणेचे स.पो.नि. सचिन सानप व गुन्हे प्रकटीकरण पथकाने सि.सि.टी.व्ही. फुटेजच्या आधारे शोध मोहिम राबवुन आरोपींची माहीती प्राप्त करुन वसई पुर्व परीसरामध्ये सापळा रचुन आरोपीत १) चंदन दिनेश सहानी वय : २३ वर्ष रा. मुकुंद नगर, गावराईपाडा, वसई पुर्व २) मोहित सुदामा सिंग वय : २२ वर्ष रा. मुकुंद नगर, गावराईपाडा, वसई (पुर्व), ३) अविनाश देवा दास वय : १८ वर्षे रा. ठि. बेलकरीपाडा, स्वतःचे घर, सफाळा पुर्व ता. जि. पालघर, ४) रंजीतकुमार श्रीरोशन मंडल वय- १९ वर्ष, रा. खैरपाडा वसई पुर्व यांना अटक करुन गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत यांच्याकडे कौशल्याने तपास केला असता त्यांनी वालीव, आचोळे, तुंळीज, पेल्हार पोलीस ठाण्यातील दाखल खालील गुन्हे केल्याचे कबुली दिल्याने गुन्हयातील चोरीस गेलेले ४० मोबाईल, ३ लॅपटॉप, १ कॅमेरा, ८ मनगटी घडयाळ व इतर मुददेमाल असा एकुण **अं.कि.रु. ४ लाख ३०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन ९ घरफोडी चोरीचे गुन्हांची यशस्वी उकल** करण्यात वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश आले आहे.

| अ.क्र. | गु.र.क्र. | पोलीस ठाणे |
|---|---|---|
| १ | गु.र.क्र.३८७/२०२४ कलम ३३१ (४),३०५ (ए),३ (५) भारतीय न्याय संहीता २०२३ अन्वये | वालीव पोलीस ठाणे |
| २ | गु.र.क्र. ३६३/२०२४ कलम ३३१ (४), ३३१(३) ३०५ (ए),भा. न्या. सं २०२३ अन्वये | वालीव पोलीस ठाणे |
| ३ | गु.र.क्र. ३८५/२०२४ कलम ३३१ (४), ३०५ (ए) भा. न्या. सं २०२३ अन्वये | वालीव पोलीस ठाणे |
| ४ | गु.र.क्र. ३९४/२०२४ कलम ३०५ , ३(५) भा. न्या. सं २०२३ अन्वये | वालीव पोलीस ठाणे |
| ५ | गु.र.क्र. ३९५/२०२४ कलम ३३१ (४), ३३१ (३),३०५ (ए) भा. न्या. सं २०२३ अन्वये | वालीव पोलीस ठाणे |
| ६ | गु.र.क्र. ६०२/२०२४ कलम ३३१ (४), ३३१ (३),३०५ (ए) भा. न्या. सं २०२३ अन्वये | तुंळींज पोलीस ठाणे |
| ७ | गु.र.क्र. ३२६/२०२४ कलम ३३१ (४), ३३१ (३),३०५ (ए) भा. न्या. सं २०२३ अन्वये | आचोळे पोलीस ठाणे |
| ८ | गु.र.क्र. ३३०/२०२४ कलम ३३१ (४), ३३१ (३) ३०५ (ए) भा. न्या. | आचोळे पोलीस ठाणे |

| | | |
|---|---|---|
| | सं २०२३ अन्वये | |
| ९ | गु.र.क्र. ६५३/२०२४ कलम ३३१ (४), ३३१ (३) ३०५ (ए) भा. न्या. सं २०२३ अन्वये | पेल्हार पोलीस ठाणे |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. उमेश माने- पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.ह./मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, संदेश हंबीरे, पो.ना. बाळु कुटे, पो.शि. विनायक राऊत, अभिजीत गढरी, सर्व नेम- वालीव पो.ठाणे, पो.ह.क्र/ भालचंद बागुल, पो.अं/अमोल बरडे, पो.अं/मोहन खांडवी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.



----------ooooo--------